# आनंद आय-पॉवर लिमिटेड

सीआयएन : U99999MH1962PLC012316
नोंदणीकृत कार्यालय : २०, एमआयडीसी इस्टेट, सातपूर, नाशिक - ४२२ ००७, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी : +९१ (०२५३) २२०२८०० ई-मेल आयडी : contact@anandipower.com
वेबसाइट : https://www.anandgroupindia.com/anandipower

## सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी कायदा, २०१३ चे अनुच्छेद ६६ सहवाचन अनुच्छेद ५२ अंतर्गत कंपनीच्या जारी, नोंदीत व पूर्णतः प्रदानित समभाग भांडवलात घट करण्याकरिता कंपनीच्या ईजीएम आयोजित करण्यात येत असलेल्या ईजीएमच्या सूचनेत विहित विशेष ठरावांवर विचारविनिमय करण्यासाठी आनंद आय पॉवर लिमिटेड ("कंपनी") च्या सभासदांची पहिली (१ ली) विशेष सर्वसाधारण सभा ("ईजीएम") कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात बुधवार, दि. ०९.०९.२०२६ रोजी स. ११.०० वा. (भा. प्र. वे.) व्हिडीओ कॉन्फरन्सिंग ("व्हीसी")/अदर ऑडिओ व्हिज्युअल मीन्स ("ओएव्हीएम") च्या माध्यमातून आयोजित करण्यात येत आहे.

कॉर्पोरेट कामकाज मंत्रालयाने ("एमसीए") सर्वसाधारण परिपत्रक दि. २२.०९.२०२५ सहवाचन परिपत्रक दि. ०८.०४.२०२०, दि. १३.०४.२०२०, दि. ०५.०५.२०२०, दि. ३१.०१.२०२१, दि. ०८.१२.२०२१ दि. १४.१२.२०२१, दि. ०५.०५.२०२२, दि. २८.१२.२०२२, दि. २५.०९.२०२३, दि. १९.०९.२०२४ व दि. २२.०९.२०२५ (एकत्रितरीत्या एमसीए परिपत्रके) यांच्या अनुपालनांतर्गत सामायिक ठिकाणी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीविना व्हिडीओ कॉन्फरन्सिंग ("व्हीसी")/अदर ऑडिओ व्हिज्युअल मीन्स ("ओएव्हीएम") च्या माध्यमातून विशेष सर्वसाधारण सभा ("ईजीएम"/"सभा") आयोजित करण्यास परवानगी दिली आहे. एमसीए परिपत्रके तसेच कंपनी कायदा, २०१३ ("कायदा") च्या संबंधित तरतुदी व त्याअंतर्गत संस्थापित नियम यांच्या अनुपालनांतर्गत कंपनीची ईजीएम व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून आयोजित करण्यात येत आहे.

**प्रस्तावित भांडवल कपात करण्यासंदर्भातील संक्षिप्त तपशील**

प्रस्तावित कपातीअंतर्गत, एशिया इन्व्हेस्टमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड व्यतिरिक्त इतर सर्व भागधारकांकडे असलेल्या आणि कंपनीच्या जारी केलेल्या, नोंदणीकृत व पूर्णतः प्रदानित सम भाग भांडवलापैकी अंदाजे ५.२८% हिस्सा दर्शविणाऱ्या, प्रत्येकी १/- रुपये दर्शनी मूल्य असलेल्या १७,५८,७४४ इक्विटी शेअर्सना रद्द करण्याचा प्रस्ताव आहे; तसेच, संबंधित भागधारकांना प्रति समभाग १६.९२ रुपये (लागू असलेले धारण कर वजा करून) इतकी रक्कम मोबदला म्हणून दिली जाणार आहे. या प्रस्ताव विशेष ठरावाद्वारे सदस्यांची मंजुरी व राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरण (मुंबई) खंडपीठ यांच्या मंजुरीच्या अधीन आहे. यासंबंधीचा संपूर्ण तपशील ईजीएमच्या आणि त्यासोबत जोडलेल्या स्पष्टीकरणात्मक निवेदनात नमूद केला आहे.

**ईजीएमच्या सूचनेची उपलब्धता**

सभासदांनी नोंद घ्यावी की, .सदर संबंधित परिपत्रकांच्या अनुषंगाने विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करणारी सूचना, कायद्याच्या कलम १०२ अन्वयेच्या स्पष्टीकरणात्मक निवेदनासह, ज्या सभासदांचे ई-मेल पत्ते कंपनीकडे वा त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (डीपी)कडे नोंदवलेले आहेत अशा सर्व सभासदांना ईजीएम आयोजित करणारी सूचना पाठवण्यात येईल. ईजीएम आयोजित करणारी सूचना कंपनीची वेबसाइट https://www.anandgroupindia.com/anandipower वर तसेच केफिन टेक्नॉलॉजीस प्रायव्हेट लिमिटेड ("केफिनटेक") - कंपनीचे रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट यांची वेबसाइट https://evoting.kfintech.com वर अपलोड करण्यात आली आहे.

**ई-मेल पत्ता नोंदणीकृत करण्याचे स्वरूप**

कागदोपत्री स्वरूपातील भागधारक असलेल्या ज्या सभासदांनी आपले ई-मेल पत्ते नोंदवलेले नसतील ते केफिनटेकची वेबसाइट https://ris.kfintech.com/clientservices/mobilereg/mobileemailreg.aspx येथे त्यांच्या धारणाचा अवश्यक तपशील तसेच ई-मेल पत्ता नोंदवण्याकरिताचे दस्तावेज सादर करून आपले ई-मेल पत्ते नोंदवू शकतील. ई-मेल पत्त्यांच्या यशस्वी नोंदणीकरणापश्चात भागधारकांना सदर एजीएममध्ये ई-मतदान करता येण्यासाठी युजर आयडी व पासवर्डसमवेत सदर सूचना व ई-मतदानाची प्रक्रिया यांची सॉफ्ट कॉपी प्राप्त होईल. इलेक्ट्रॉनिक स्वरूपात भागधारक असलेल्या सभासदांनी कंपनीकडून सर्व पत्रव्यवहार इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्राप्त करण्यासाठी त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (डीपीज्) यांच्याकडे त्यांचे ई-मेल पत्ते नोंदवावेत/अद्ययावत करावेत.

**ई-मतदानाच्या माध्यमातून मतदान करण्याचे स्वरूप**

कंपनी कायदा, २०१३ चे अनुच्छेद १०८ सहवाचन कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ (सुधारित केल्यानुसार) चे नियम २० यांच्या तरतुदी तसेच वरील परिपत्रकांच्या अनुषंगाने कंपनी आपल्या सभासदांना केफिनटेकच्या माध्यमातून परोक्ष ई-मतदान सुविधा उपलब्ध करून देत आहे. व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून सभेस उपस्थित राहण्याकरिताचे निर्देश तसेच ई-मतदानाचे स्वरूप एजीएम आयोजित करणाऱ्या सभेच्या सूचनेत दिलेले आहे. वरील विहित प्रक्रियेनुसार आपले ई-मेल पत्ते यशस्वीरीत्या नोंदवल्यानंतर सभासदांना ई-मतदान प्रणालीच्या माध्यमातून मत देण्याकरिताची लॉग इन अर्हता उपलब्ध करून देण्यात येईल. सर्व सभासदांना सूचित करण्यात येत आहे की :

१) ईजीएमच्या सूचनेत विहित सामान्य व विशेष ठरावांवर इलेक्ट्रॉनिक मतदानाद्वारे विचारविनिमय करता येईल.

२) परोक्ष ई-मतदान रविवार, दि. ०६.०९.२०२६ रोजी स. ९.०० वाजता सुरू होईल व मंगळवार, दि. ०८.०९.२०२६ रोजी सायं. ५.०० वाजता संपेल.

३) मंगळवार, दि. ०८.०९.२०२६ रोजी सायं. ५.०० पश्चात परोक्ष ई-मतदानास परवानगी नसेल.

४) ईजीएम करिताची निर्धारित अंतिम तारीख ही बुधवार, दि. ०२.०९.२०२६ अशी असेल.

५) निर्धारित अंतिम तारखेनुसार ज्या सभासदांची नावे सभासदांचे रजिस्टर किंवा डिपॉझिटरीजद्वारे तयार करण्यात आलेल्या लाभार्थी मालकांच्या रजिस्टरमध्ये नोंद असतील असे सभासद केवळ परोक्ष ई-मतदान तसेच ईजीएम दरम्यान मतदानाची सुविधा प्राप्त करण्यास पात्र असतील.

६) सूचनेच्या पाठवणीपश्चात ज्या सभासदांनी कंपनीचे शेअर्स प्राप्त केलेले असतील व कंपनीचे सभासद बनले असतील व वरील निर्देशित निर्धारित अंतिम तारखेनुसार भागधारक असतील ते सभासद einward.ris@kfintech.com येथे ई-मेल पाठवून लॉग इन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकतील.

७) सभेमध्ये उपस्थित असलेल्या व परोक्ष ई-मतदानाद्वारे आपले मत न दिलेल्या सभासदांनी वेबपेजवरील Instapoll या आयकॉनवर क्लिक करावे व ठरावावर मत देण्यासाठीच्या निर्देशांचे पालन करावे.

८) परोक्ष ई-मतदानाद्वारे आपले मत दिल्यानंतरही सभासद ईजीएममध्ये सहभाग घेऊ शकतील, परंतु त्यांना सभेमध्ये पुन्हा मत देण्याची परवानगी नसेल.

ई-मतदान व ई-ईजीएमच्या स्वरूपासंदर्भात सभासदांनी कृपया ईजीएमच्या सूचनेतील निर्देशांचे पालन करावे तसेच ई-मतदानासंदर्भात काही शंका वा प्रश्न असल्यास तुम्ही https://evoting.kfintech.com च्या help section अंतर्गत उपलब्ध Frequently Asked Questions (""FAQs") व e-voting manual वाचू शकता किंवा evoting@kfintech.com वर ई-मेल लिहू शकता किंवा श्री. सशिधर मन्नावा, व्हाइस प्रेसिडेंट यांना einward.ris@kfintech.com येथे संपर्क साधू शकता किंवा केफिनटेकचा टोल फ्री क्रमांक १-८००-३०९-४००१ येथे पुढील कोणत्याही स्पष्टीकरणासाठी संपर्क साधू शकता.

आनंद आय-पॉवर लिमिटेड करिता
सही/-
मयूर सुभाष बंब
पूर्णवेळ संचालक

ठिकाण : नाशिक
दिनांक : ११.०८.२०२६